0

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ACB पहिली खबर क्र. FIR No. 29 वर्ष Year 2025 दिनांक Date 20/09/25

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. कलमे Sections 7

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day मंगळवार तारीख पासून Date from 16/09/25 वेळ Time 13:00 वा. तारीख पर्यंत Date to 19/09/25 वेळ Time 13:40 वा.

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) ✓ १२.०० ते १५.००

(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 16/09/25 वेळ Time 13:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 7/25 तारीख Date 20/09/25 वेळ Time 03:30 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral समक्ष

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. पश्चिमेस चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. 27 km

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बृहन्मुंबई महानगर पालिका, पी नॉर्थ वार्ड, ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road 400064 तळमजला उपाहारगृह, मालाड प. मुंबई गाव Village पोस्ट Post तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name राजेंद्र कांबळे

(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name शांताराम कांबळे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 34 वर्षे

(d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8657149947

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........

(f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion ........ जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address बी/318 मुक्ता गल्ली/सर्व्हे नं. Ward ठाकूरसिंग घर/नाव नं. House Name No. ८-बी फोन/मो. नं. Phone No. एम. सी. पॅन नं. Pan No. कॉलनी व्होटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road साईनगर एम. जी. रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गाव Village कांदिवली (प) पोस्ट Post मुंबई पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) प्रशांत प्रकाश कासारे, वय 48 वर्षे, कनिष्ठ पर्यवेक्षक, रा. डि. इ-52 शिवसाया को. ऑ. हौ. सो., एस. व्ही. रोड, फत्तेबाग, कांदिवली पश्चिम मुंबई 400067

(2) संतोष गोविंद मोहकर, वय 56 वर्षे, प्लॉट नं. 270/136, साई श्रद्धा को. ऑ. हौ. सो गोराई 2, बोरीवली पश्चिम, मुंबई

फिर्यादी राजेंद्र शांताराम कांबळे वय ३५ वर्षे, धंदा-नोकरी (कामगार) रा. ठि. बी/३१३, मुक्ता हाऊसिंग सोसायटी, ४ बी, एम. सी. कॉलनी साईनगर, एम. डी. रोड, कांदिवली (प) मुंबई यांचा जबाब स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आला असुन तोच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष.

D.Mmane
20/09/25
(माधुरी माने)
पोलीस निरीक्षक
भा.प्र.वि. मुंबई

R.S. Kamble
राजेंद्र शांताराम कांबळे.

दिनांक २०/०९/२०२५

जबाब

श्री. राजेंद्र शांताराम कांबळे, वय ३४ वर्षे, धंदा – कामगार, मालवणी नंबर ५, गेट नंबर २, बृहन्मुंबई महानगरपालिका, घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग, मालाड पश्चिम, मुंबई. रा.ठि. बी/३१८, एकता हाऊसींग सोसायटी, बी.एम.सी. कॉलनी, साईनगर, एम.जी.रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई – ४०००६७. मो.नं. ८६५७१४९४७०.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर मागील ०३ वर्षापासुन माझे कुटूंबियासह रहावयास आहे. मी मागील १५ वर्षापासुन मालवणी नंबर ५, बृहन्मुंबई महानगरपालिका, घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग, मालाड पश्चिम, मुंबई येथे कामगार म्हणून कचरा उचलण्याचे काम करीत आहे. मी दररोज सकाळी ०६.३० वाजता मालवणी नंबर ५, गेट नंबर २ येथील चौकीमध्ये फेस पंचींग करुन कामाला सुरवात करतो. काम संपल्यानंतर दुपारी ०१.३० वाजता पुन्हा फेस पंचींग करुन घरी जातो.

दिनांक १२/०९/२०२५ रोजी मी नेहमीप्रमाणे मालवणी नंबर ५, गेट नंबर २ येथील चौकीमध्ये सकाळी ०६.३० वाजता फेस पंचींग करुन कामाला सुरवात केली. तेथे मुकादम मुकेश चावडा व ज्युनिअर ऑफीसर अरुण पवार आहेत. माझे बिटचे काम पुर्ण झाल्यानंतर मुकादम मुकेश चावडा व अरुण पवार यांनी मला दुसऱ्या बिटमध्ये मालवणी नंबर ५, प्लॉट नंबर १४ येथील कचरा उचलण्याचे काम सांगितले. मी तेथील कचरा एकत्र जमा करुन मुख्य रस्त्याच्या बाजुला आणुन ठेवला. सकाळी १०.३० ते ११.०० वाजता मुकेश चावडा व अरुण पवार यांनी मालवणी नंबर ५, प्लॉट नंबर १४ येथे राऊंड मारला असता त्यांना कचरा उचलला नसल्याचे दिसले. त्यावेळी अरुण पवार यांनी मला फोन करुन कचरा का उचलला नाही, याबाबत विचारणा केली असता मी त्यांना सामान नसल्याचे सांगुन थोडया वेळात कचरा उचलतो, असे सांगितले. त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता मी चौकीमध्ये गेलो असता मुकादम चावडा यांनी मला 'कामावर तुझा खाडा मारलेला आहे' असे सांगितले. तेव्हा मी मस्टरमध्ये सही करण्यास गेलो असता Run Way असा माझा खाडा केल्याचे हजेरी मस्टर मध्ये दिसले. त्यावेळी मला राग आल्याने मी हजेरी मस्टर जमीनीवर खाली आपटले. त्यानंतर मुकादम मुकेश चावडा सोबत माझे वाद झाले.

दिनांक १३/०९/२०२५ रोजी मी नेहमीप्रमाणे मालवणी नंबर ५, गेट नंबर २ येथील चौकीमध्ये सकाळी ०६.३० वाजता फेस पंचींग करण्यास गेलो असता अरुण पवार यांनी मला थांबवीले. तरीसुध्दा मी फेस पंचीग केली. तेव्हा अरुण पवार यांनी माझे काही न ऐकता मला सांगितले की, ' तु अगोदर सुपरवायझर संतोष मोहकर आणि हेड सुपरवायझर नेरुळकर हयांना भेट त्यानंतरच तु कामावर हजर हो.'

दिनांक १४/०९/२०२५ रोजी रविवारी माझी सुटी असल्यामुळे दिनांक १५/०९/२०२५ रोजी दुसऱ्या बीटमधील माझे ओळखीचे ज्युनिअर ऑफीसर प्रशांत कासारे व माझे बीटचे ज्युनिअर ऑफीसर अरुण पवार यांनी माझी समजुत काढली. मला हजेरी मस्टर खाली फेकायचे नाही, असे सांगुन माफीनामा लिहुन देण्यास सांगितले. त्याप्रमाणे लगेच माफीनामा लिहुन मी बृमनपा घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग येथे सुपरवायझर संतोष मोहकर आणि हेड सुपरवायझर नेरुळकर यांना भेटण्यास गेलो असता नेरुळकर साहेबांची भेट झाली नाही. मात्र सुपरवायझर संतोष मोहकर भेटले. त्यांना मी माझा माफीनामा दाखविला असता त्यांनी मला 'तुझ्या बदलीचा आदेश काढलेला असुन सही होण्याकरीता नेरुळकर साहेबांच्या टेबलवर ठेवला आहे. अजुन आदेशावर सही झालेली नसुन तुला जर बदलीचा आदेश थांबवायचा असेल तर रुपये १०,०००/– ते १५,०००/– दयावे लागतील, असे सांगुन लाचेच्या रकमेची मागणी केली.

परंतू मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १६/०९/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता ॲन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या ठिकाणी गेलो. तेथे माझे तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोलीस निरिक्षक निलेश पाटील व पोलीस निरिक्षक माधुरी माने यांची नेमणूक करण्यात आली. श्रीमती माने मॅडम यांनी मला बृमनपा घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग येथील सुपरवायझर संतोष मोहकर हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले असता मी तक्रार अर्ज लिहुन दिला. त्यांनतर दोन शासकीय पंचाना बोलाविण्यात आले. श्रीमती माने मॅडम यांनी त्या दोन पंचांची श्री. दत्तात्रय पाटील व श्री. संदेश वांगणेकर अशी ओळख करुन दिली. तो तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला असता

अर्ज वाचुन दोन पंच, माने मॅडम व पाटील साहेबांनी सही केली. तो तक्रार अर्ज माने मॅडम यांनी स्वत:चे
ताब्यात ठेवला. त्यानंतर माने मॅडम यांनी माझे तक्रारीची त्या पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे
सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता माने मॅडम,
श्री. पाटील साहेब, मी, दोन्ही पंच व पोलीस पथक पोलीस वाहनातुन बीएमसी, पी/नॉर्थ विभाग येथे जाण्यास
निघालो. पोलीस वाहन मालाड रेल्वे स्टेशन पुर्व, मुंबई येथे थांबविण्यात आले. लाचेच्या मागणीची पडताळणी
करण्याकरीता पोलीस वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे, दोन्ही पंच व श्रीमती माने मॅडम यांचे वक्तव्य
रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच
श्री दत्तात्रय पाटील यांचेसोबत बीएमसी ऑफीस, पी/नॉर्थ वार्ड येथे सुपरवायझर संतोष मोहकर यांना
भेटण्यास ऑटोरिक्षाने पाठविण्यात आले. तेथे गेल्यानंतर मोहकर साहेब दिसुन न आल्याने मी व पंच दत्तात्रय
पाटील मालाड रेल्वे स्टेशन पुर्व, मुंबई येथे पडताळणी पथकाजवळ परत आलो. सुपरवायझर संतोष मोहकर
यांची भेट न झाल्याने आंम्ही सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. त्यानंतर माने मॅडम यांनी
दुसऱ्या दिवशी दिनांक १७/०९/२०२५ रोजी मालाड रेल्वे स्टेशन पुर्व, मुंबई येथे येण्यास सांगितले.

मी दिनांक १७/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मालाड रेल्वे स्टेशन पुर्व, मुंबई या ठिकाणी
श्रीमती माने मॅडम यांनी सांगीतल्याप्रमाणे मो/सा ने हजर झालो. तेव्हा सदर ठिकाणी पो.नि.पाटील, पो.नि माने
मॅडम व पोलीस पथक हे पोलीस वाहनाने तेथे आले, तेव्हा पो.नि.माने मॅडम यांनी पंच श्री दत्तात्रय पाटील
यांचे बदली आलेले पंच श्री. धर्मेंद्र शिंदे यांचेशी ओळख करुन दिली. त्यांना तक्रार अर्ज वाचण्यास दिला
असता अर्ज वाचुन पंच श्री शिंदे यांनी त्यावर सही केली. तो तक्रार अर्ज माने मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात
ठेवला. माने मॅडम यांनी माझे तक्रारीची त्या पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून त्याकरीता
करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता माने मॅडम, श्री. पाटील साहेब,
मी, दोन्हीं पंच व पोलीस पथक असे पोलीस वाहनातुन बीएमसी, पी/नॉर्थ विभाग येथे जाण्यास निघालो.
पोलीस वाहन इंद्रप्रस्थ सोसायटी, मालाड पुर्व, मुंबई येथे थांबविण्यात आले. लाचेच्या मागणीची पडताळणी
करण्याकरीता पोलीस वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे, दोन्ही पंच व श्रीमती माने मॅडम यांचे वक्तव्य
रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच
श्री.शिंदे यांचेसोबत बीएमसी ऑफीस, पी/नॉर्थ वार्ड येथे सुपरवायझर संतोष मोहकर यांना भेटण्यास मो/सा ने
गेलो. मी संतोष मोहकर यांस भेटलो असता त्यांनी माझा बदलीचा आदेश थांबविण्यासाठी स्वत:साठी रु.
१०,०००/- लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी
मला ज्युनिअर ऑफीसर कासारे यांच्याशी संपर्क करण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच शिंदे इंद्रप्रस्थ
सोसायटी, मालाड पुर्व, मुंबई येथे पडताळणी पथकाजवळ मो/सा ने परत आलो. तेथे व्हाईस रेकॉर्डरमध्ये
झालेले रेकॉर्डिंग पंचासमक्ष ऐकण्यात आले. त्यामध्ये संतोष मोहकर यांनी माझेकडे १० हजार रुपये लाच
मागणी केल्याचे ऐकु आले. त्यानंतर माने मॅडम यांनी मला ज्युनिअर ऑफीसर कासारे यांना फोन करण्यास
सांगितले. मी कासारे यांना फोन केला असता तो पोलीस वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करण्यात
आला. त्यावेळी कासारे यांना मी मोहकर साहेबांनी रु. १०,०००/- लाचेची मागणी केल्याचे सांगितले.
त्यावेळी त्यांनी 'तुझ जे काही आहे, ते साहेबांना बोल, सात साडे सात हजार रूपये साहेबांना देउन टाक' असे
मला सांगितले. त्यानंतर मला फेस पंचींग करण्यास माझे चौकीमध्ये जायचे असल्याने मी फेस पंचींग करुन
परत पोलीस वाहनाजवळ आलो. त्यानंतर आंम्ही सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. त्यानंतर
माने मॅडम यांनी दुसऱ्या दिवशी दिनांक १८/०९/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात येण्यास
सांगितले.

मी दिनांक १८/०९/२०२५ रोजी सकाळी ११.४० वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या
ठिकाणी गेलो. सुपरवायझर संतोष मोहकर यांनी लाचेची रक्कम घेवून बोलावले असल्याने माने मॅडम यांनी
मला सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्याबाबत माहिती दिली. माने मॅडम यांनी
माझेकडे सापळा कारवाईकरीता आवश्यक रकमेची विचारणा केली असता मी त्यांना माझे बचतीतील सोबत
आणलेले रु. ७,५००/- रुपये काढुन दिले. त्यानंतर अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात सापळापुर्व कारवाई पुर्ण
करण्यात आली. त्यानंतर अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे, दोन्ही पंच व
श्रीमती माने मॅडम यांचे वक्तव्य रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर सापळा कारवाईकरीता माने मॅडम, पाटील
साहेब, मी, पंच शिंदे व पोलीस पथक दोन पोलीस वाहने कुरार मेट्रो स्थानक, पश्चिम द्रुतगती मार्ग, मालाड

पश्चिम, मुंबई येथे थांबवुन आम्ही सर्वजण ॲटोरिक्शामध्ये डीटीडीसी कुरीअर सर्व्हिस, लीबर्टी गार्डनजवळ, मालाड पश्चिम,मुंबई येथे आलो, त्यानवेळी पंच वांगणेकर हे त्यांचे खाजगी मो/वाहन क्र. एम.एच.१४.के.एस. ६६३८ ने डीटीडीसी कुरीअर सर्व्हिस येथे आले. त्यावेळी माने मॅडम व पाटील साहेब यांनी मला, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री शिंदे यांचेसोबत बीएमसी ऑफीस, पी/नॉर्थ वार्ड येथे सुपरवायझर संतोष मोहकर यांना लाचेची रक्कम रु. ७,५००/— देण्याकरीता पाठविण्यात आले. सापळा पथक सुध्दा काही अंतर थांबुन हजर होते. तेथे गेल्यानंतर मोहकर साहेब दिसुन न आल्याने मी व पंच शिंदे डीटीडीसी कुरीअर सर्व्हिस, लीबर्टी गार्डनजवळ, मालाड पश्चिम, मुंबई येथे खाजगी मो/वाहन क्र. एम.एच.१४.के.एस.६६३८ जवळ परत आलो असता माझे बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोहेकॉ/यादव यांनी बंद केला. त्यानंतर साधारण अंदाजे ०१ तास थांबुन पुन्हा माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोहेकॉ/यादव यांनी लावुन पंच श्री शिंदे यांचेसोबत मला बीएमसी ऑफीस, पी/नॉर्थ वार्ड येथे सुपरवायझर संतोष मोहकर यांना लाचेची रक्कम रु. ७,५००/— देण्याकरीता पाठविण्यात आले. तेथे गेल्यानंतर मोहकर साहेबांची भेट न झाल्याने मी व पंच शिंदे डीटीडीसी कुरीअर सर्व्हिस, लीबर्टी गार्डनजवळ, मालाड पश्चिम, मुंबई येथे खाजगी वाहनाजवळ परत आलो. सुपरवायझर संतोष मोहकर यांची भेट न झाल्याने आम्ही सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. त्यावेळी माने मॅडम यांनी लाचेची रक्कम माझेकडे परत दिली व मला दुसऱ्या दिवशी दिनांक १९/०९/२०२५ रोजी लाचेची रक्कम बदलुन नवीन नोटा घेवून डीटीडीसी कुरीअर सर्व्हिस, लीबर्टी गार्डनजवळ, मालाड पश्चिम, मुंबई येथे येण्यास सांगितले.

मी दिनांक १९/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता डीटीडीसी कुरीअर सर्व्हिस, लीबर्टी गार्डनजवळ, मालाड पश्चिम, मुंबई याठिकाणी माझे बाईकवरुन गेलो. तेथे माने मॅडम, पाटील साहेब, दोन्ही पंच व पोलीस पथक हजर होते. माने मॅडम यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून सर्व सापळा पथक व दोन्ही पंच असे आम्ही तिथुनच जवळ उभ्या असलेल्या खाजगी मो/वाहन क्र. एम.एच.१४.के.एस.६६३८ जवळ गेलो. माने मॅडम यांनी माझेकडे सापळा कारवाईकरीता आवश्यक रकमेची विचारणा केली असता मी त्यांना माझे बचतीतील सोबत आणलेल्या रु. ७,५००/— च्या नवीन नोटा काढुन दिल्या. त्यानंतर खाजगी वाहनातच सापळापुर्व कारवाई पुर्ण करण्यात आली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे, दोन्ही पंच व श्रीमती माने मॅडम यांचे वक्तव्य रेकॉर्ड करण्यात आले. माने मॅडम व पाटील साहेब यांनी मला, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री शिंदे यांचेसोबत बीएमसी ऑफीस, पी/नॉर्थ वार्ड येथे सुपरवायझर संतोष मोहकर यांना लाचेची रक्कम रु. ७,५००/— देण्याकरीता पाठविण्यात आले. सापळा पथक सुध्दा काही अंतरावर थांबुन हजर होते. तेथे जाउन संतोष मोहकर यांस भेटलो असता त्यांनी मला ज्युनिअर ऑफीसर कासारे यांना भेटण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच शिंदे सापळा पथकाजवळ परत आलो. त्यानंतर माने मॅडम यांनी मला ज्युनिअर ऑफीसर कासारे यांना फोन करण्यास सांगितले. मी कासारे यांना फोन केला असता तो फोन कॉल खाजगी वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करण्यात आला. त्यावेळी श्री. कासारे यांनी मला बीएमसी ऑफीस, पी/नॉर्थ वार्ड येथील कॅन्टीनमध्ये बोलाविल्याने मी व पंच शिंदे तेथे गेलो असता श्री कासारे भेटले. श्री कासारे यांनी पंचासमक्ष माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यावेळी मी माझे शर्टाच्या खिशातील लाचेची रक्कम रू. ७,५००/— काढुन श्री कासारे यांचेकडे दिली. श्री कासारे यांनी सदर रक्कम स्विकारली असता लाचेची रक्कम दिल्याबाबत मी माझे डोक्यावरील टोपी डाव्या हातानी काढुन मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. लगेचच सापळा पथकामधील अंमलदारांनी श्री कासारे यास लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. माने मॅडम यांनी त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव श्री. प्रशांत प्रकाश कासारे, पद — ज्युनिअर ऑफीसर, बृहन्मुंबई महानगरपालिका, घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग, मालाड पश्चिम, मुंबई. रा.ठि. इ—५२, शिवसत्यम को.ऑ.हौ.सोसा., फतेहबाग, कांदीवली पश्चिम, मुंबई असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या उजव्या हातामध्ये मी दिलेली लाचेची रक्कम रु. ७,५००/— मिळुन आली. ती पंच श्री वांगणेकर यांच्या ताब्यात देण्यात आली. त्यानंतर माने मॅडम यांचे सांगण्यावरुन श्री प्रशांत कासारे याने त्याचे मोबाईलवरुन मोहकर साहेब यांना कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला, त्यावेळी मी लाचेची रक्कम रु. ७,५००/— दिल्याबाबत कासारे यांनी लोकसेवक संतोष मोहकर यांना सांगितले.

तरी श्री संतोष गोविंद मोहकर, वय–५६ वर्षे, पद – पर्यवेक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग, मालाड पश्चिम, मुंबई यांनी त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून, स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता माझी बदली न करण्यासाठी माझेकडे बेकायदेशीर मार्गाने रू. १०,०००/– लाचेची मागणी केली. त्यानंतर श्री. प्रशांत प्रकाश कासारे, वय–४८ वर्षे, पद– ज्युनिअर ऑफीसर, बृहन्मुंबई महानगरपालिका, घन कचरा व्यवस्थापन खाते, पी/नॉर्थ विभाग, मालाड पश्चिम, मुंबई यांनी श्री.संतोष मोहकर यांचेकरीता तडजोडीअंती रु. ७,५००/– लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून माझी त्या दोघांच्या विरोधात तक्रार आहे.

माझा वरील मराठी भाषेतील जबाब मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

R.S. Kamble

राजेंद्र शांताराम कांबळे

20/09/25

(माधुरी माने)

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —

Unnatural / Accidental Death Case No., if any.

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र. 7 मधील आरोपी क्र. 2 यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे रु. 10,000/- (दहा हजार) लाचेची मागणी केली. त्यानंतर आरोपी क्र. 1 यांना आरोपी क्र. 2 यांचेकरीता तडजोडी अंती 7,500/- रुपये लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून भ्र. प्र. अधि कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ............ माधुरी माने, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............ जिल्हा ............ राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............

(3) Transferred to P. S. ............

District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. R. S. Kamble

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost. (R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा R.S. Kamble

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही M. Mane 20/09/25

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ............ माधुरी माने

पदनाम Rank ............ पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ............

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 20/09/25

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report